21 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘मूकनायक’मधील वृत्त भाषांतरित

## कुलगुरू डॉ. शिर्के; माणगावात डॉ. आंबेडकरांच्या स्मारकास अभिवादन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ‘मूकनायक’मध्ये प्रकाशित माणगाव परिषद वार्तांकनाचा अनुवाद विविध भारतीय तसेच परदेशी भाषांमध्ये करून त्यांचे संकलित पुस्तक प्रकाशित करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे दिली.

माणगाव परिषदेचा १०१ वा वर्धापन दिन उद्या (ता. २१) साजरा होतो आहे. त्याच्या पूर्वसंध्येला कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी माणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.



माणगाव : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला डॉ. डी. टी. शिर्के यांनी अभिवादन केले. या वेळी डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एस. एस. महाजन, अनिल माणगावकर आदी.

डॉ. शिर्के म्हणाले, “डॉ. आंबेडकर यांच्या राष्ट्रीय नेतृत्वाची घोषणा साक्षात राजर्षी शाहू महाराजांनी माणगाव परिषदेत केली. पुढे डॉ. आंबेडकरांनीही महाराजांचे भाकीत प्रत्यक्षात उतरविले. त्या दृष्टीने माणगाव परिषद ऐतिहासिक ठरते. या परिषदेची सविस्तर माहिती बाबासाहेबांच्या मूकनायक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यामुळेच मिळू शकली.”

डॉ. महाजन यांनी माणगाव परिषदेचे ऐतिहासिक महत्त्व तसेच परिषदेसाठी माणगावची निवड करण्यामागील राजर्षी शाहू महाराज यांची भूमिका याविषयी माहिती दिली. अनिल माणगावकर यांनी प्रास्ताविक केले. माणगाव बौद्ध समाज अध्यक्ष अरुण शिंगे यांनी आभार मानले. अनिल कांबळे, शिरीष मघाळे, योगेश सनदी, नंदकुमार शिंगे, पांडुरंग कांबळे, राहुल शिंगे, श्रीकांत चव्हाण, अनिकेत कांबळे आदी उपस्थित होते.

21 MAR 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मूकनायक' मधील वार्तांकनाच्या अनुवादाचे पुस्तक करू

## कुलगुरू डॉ. शिर्के : माणगाव परिषद वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला दिली भेट

कोल्हापूर : प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक'मध्ये प्रकाशित झालेल्या माणगाव परिषदेच्या वार्तांकनाचा अनुवाद विविध भारतीय तसेच परदेशी भाषांमध्ये करून त्याचे संकलित पुस्तक शिवाजी विद्यापीठातर्फे प्रकाशित करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी यांनी दिली. माणगाव परिषदेचा १०१ वा वर्धापनदिन दि. २१ मार्च रोजी साजरा होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला त्यांनी माणगावला भेट देऊन तेथील स्मारकाचे दर्शन घेतले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय नेतृत्वाची घोषणा साक्षात राजर्षी शाहू महाराज यांनी माणगाव परिषदेत केली. पुढे डॉ. आंबेडकरांनी महाराजांचे भाकीत प्रत्यक्षात उतरविले. त्यादृष्टीने माणगाव परिषद ऐतिहासिक महत्त्वाची ठरते. या परिषदेची सविस्तर माहिती बाबासाहेबांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यामुळेच मिळू शकली. ही माहिती विविध भाषिक वाचकांना मिळायला हवी.'



कोल्हापूर : माणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. एस. एस. महाजन, अनिल माणगावकर आदी.

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी माणगाव परिषदेचे ऐतिहासिक महत्त्व तसेच परिषदेसाठी माणगावची निवड करण्यामागील राजर्षी शाहू महाराज यांची भूमिका याविषयी सविस्तर माहिती दिली. अनिल माणगावकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. माणगाव बौद्ध समाज अध्यक्ष अरुण शिंगे यांनी आभार मानले.

दरम्यान, कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी माणगाव येथे उभारलेल्या बाबासाहेबांच्या लंडन येथील निवासस्थानाच्या प्रतिरूप निवासस्थानासह माणगाव स्मारकाची पाहणी केली. बाबासाहेबांनी परिषदेवेळी ज्या शाळेत मुक्काम केला होता, त्या इमारतीसही त्यांनी भेट दिली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच माणगाव येथील अनिल कांबळे, शिरीष मधाळे, योगेश सनदी, नंदकुमार शिंगे, पांडुरंग कांबळे, राहुल शिंगे, श्रीकांत चव्हाण, अनिकेत कांबळे आदी उपस्थित होते.

21 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माणगाव परिषदेवर ग्रंथ निर्मिती करणार

## कुलगुरूंची घोषणा : जगभरातील अभ्यासकांना उपलब्ध करून देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पाक्षिक मूकनायकमधील ऐतिहासिक माणगाव परिषदेतील भाषण, छत्रपती शाहू महाराज यांचे भाषण व त्या परिषदेतील पारित झालेले पंधरा ठराव यांचे मूकनायक या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वृत्तांचे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्यामार्फत देशी व परदेशी भाषेत अनुवाद करून हा ऐतिहासिक दस्तऐवज या शताब्दी वर्षानिमित्त जगभरातील विचारवंत आणि अभ्यासकांना ग्रंथ रूपाने निर्मिती करून उपलब्ध करून दिला जाईल, अशी घोषणा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली.



माणगाव परिषदेच्या १०१ व्या शताब्दी निमित्ताने शनिवारी माणगाव (ता. हातकणंगले) येथे छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिवाजी विद्यापीठातर्फे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अभिवादन केले.

माणगाव परिषदेच्या १०१ व्या शताब्दी निमित्ताने सन्मान भूमी माणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शाहू महाराज यांना शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवारी अभिवादन करण्यात आले. माणगाव परिषद राष्ट्रीय स्मारक समितीचे अनिल कांबळे माणगावकर यांनी ग्रंथ निर्मितीची मागणी कुलगुरूंकडे केली. याचा संदर्भ घेत कुलगुरू शिर्के यांनी ग्रंथ निर्मितीची घोषणा केली.

यावेळी शिर्के म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय नेतृत्वाची घोषणा साक्षात राजर्षी शाहू महाराजांनी माणगाव परिषदेत केली. पुढे डॉ. आंबेडकरांनीही महाराजांचे भाकीत प्रत्यक्षात उतरविले. त्या दृष्टीने माणगाव परिषद ऐतिहासिक महत्त्वाची ठरते.

या परिषदेची सविस्तर माहिती बाबासाहेबांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यामुळेच आपल्याला मिळू शकली. या परिषदेची ही माहिती विविध भाषिक वाचकांना मिळायला हवी, यासाठी विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने या वार्तांकनाचे विविध भारतीय व परदेशी भाषांत अनुवाद करण्याचा प्रकल्प तातडीने हाती घेण्यात येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी शताब्दी वर्षानिमित्ताने विद्यापीठाने चर्चासत्र, व्याख्यानाचे आयोजन केल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित सर्वांनी स्मारक, लंडन हाऊस, होलोग्राफिक शो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुक्कामाची पुनीत झालेली कागल जहागिरीतील शाळा इमारत यांना भेट देऊन पाहणी करून समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे डॉ. एस. एस. महाजन, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, बौद्ध समाजाचे अध्यक्ष अरुण शिंगे, शिरीष मधाळे, नाना बिराजे, भिकाजी शिंगे, श्रीकांत चव्हाण, पांडुरंग कांबळे, भीमराव कांबळे, सुधाकर कांबळे, योगेश समदी, आदी उपस्थित होते. आभार नंदकुमार शिंगे यांनी मानले.

लोकमत



देवचंद महाविद्यालयात देवचंद शाह यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, कमला हर्डीकर, प्राचार्य पी. एम. हेरेकर उपस्थित होते.

# देवचंद शाह यांनी गरिबांच्या उच्च शिक्षणाची सोय केली

## व्ही. एन. शिंदे : स्मृतिदिनी अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**म्हाकवे :** स्वकमाईतील धन आणि ध्येयासक्तीच्या जोरावर पद्मभूषण देवचंदजी शाह यांनी सीमाभागातील गरीब मुलांच्या उच्चशिक्षणाची सोय केली. त्यामुळे त्यांना 'देवाघरचा चंद्र' ही दिलेली उपमा सार्थ आहे. तब्बल ४५ एकरांत लावलेल्या देवचंद कॉलेजच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. त्यातूनच देवचंदजी यांच्या दूरदृष्टीची प्रचिती येते, असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी काढले.

अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयात पद्मभूषण देवचंदजी शाह स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक प्रकाश शाह होते. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. कमला हर्डीकर उपस्थित होत्या.स्व. देवचंदजी शाह यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.महाविद्यालयाच्या जडणघडणीत पत्रकारांचेही योगदान आहे. याबाबत कृतज्ञता म्हणून सीमाभागातील पत्रकारांना सन्मानित करण्यात आले. प्राचार्य डॉ. पी. एम. हेरेकर यांनी प्रास्ताविकात ६० वर्षांच्या विकासाचा आढावा घेतला. यावेळी प्रसिद्धी विभागातील वृत्तपत्र कात्रण संग्रहाचे प्रकाशन झाले.

लोकमत

# सामाजिक चिकित्सालय जगण्याची आशा देईल

## डॉ. जगन कराडे यांचे प्रतिपादन

[illegible]

चर्चेतील मुलाखत



[illegible]

### लोकाभिमुख करू

[illegible]

### प्रश्नांच्या मुळात जाऊ

[illegible]

### भावनांचा कोंडमारा केंद्रास संपर्क साधा

[illegible]

2 1 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘कमवा, शिका योजने’त विद्यार्थिनींचे पाऊल पुढे

## गतवर्षी ७० मुलींनी घेतला लाभ; स्वावलंबनातून केले शिक्षण पूर्ण

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठातील ‘कमवा व शिका योजने’ला विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या वर्षी ७० विद्यार्थिनींनी या योजनेत नाव नोंदणी केली होती. या विद्यार्थिनी विविध प्रकारची कामे करतात. त्याचा त्यांना मोबदला मिळतो. त्यातून या विद्यार्थिनींचा मेस आणि राहण्याचा खर्च पूर्ण होतो. त्यांच्यासाठी नवे वसतिगृहही उभारले आहे.

विद्यापीठातील गरजू विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक कारणातून थांबू नये, यासाठी पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ‘कमवा व शिका’ योजना विद्यापीठात सुरू केली. याचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना झाला. तीन दशकांत मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण लक्षणीय वाढले आहे. विद्यापीठात आता मुलामुलींचे प्रमाण समसमान आहे. काही अधिविभागांत मुलांपेक्षा मुलींची संख्या अधिक आहे. मुलींत गरजू विद्यार्थिनीही आहेत. दहा वर्षांपूर्वी या विद्यार्थिनींसाठीही कमवा व शिका योजना सुरू केली. सुरुवातीला या योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या मर्यादित होती; मात्र पाच वर्षांत ही संख्या वाढली आहे. गेल्या वर्षी ७० मुलींनी या योजनेसाठी प्रवेश घेतला. या विद्यार्थिनींना तीन ते चार तासांचे काम दिले जाते. महिन्याला त्यांना दोन ते अडीच हजार रुपये मिळतात. त्यातून त्यांची वसतिगृह आणि मेसच्या पैशांची रक्कम पूर्ण होते. गेल्यावर्षी कोरोनामुळे शैक्षणिक वर्ष अपुरे राहिले. नव्या शैक्षणिक वर्षात अद्याप वसतिगृहाचे प्रवेश झाले नाहीत; पण यंदाही या योजनेत विद्यार्थिनींचा सहभाग जास्त असेल, असे वसतिगृहाच्या रेक्टर सांगतात.



कोल्हापूर : कमवा व शिका योजनेतील मुलींचे वसतिगृह.



> कमवा व शिका योजनेचा लाभ विद्यार्थिनीही मोठ्या प्रमाणात घेतात. यातून मिळणाऱ्या पैशांतून त्यांचे शिक्षण होते. पाच वर्षांत विद्यार्थिनींची या योजनेतील संख्या वाढत आहे. मुली गांभीर्याने सर्व कामे करतात. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळले असून त्यांना परिस्थितीची जाणीव असते.
>
> – डॉ. प्रतिमा पवार, रेक्टर, शिवाजी विद्यापीठ मुलींचे वसतिगृह

पुढारी



शिवाजी विद्यापीठातून...

# ऑफलाईन ६३ हजार, ऑनलाईन ६१ हजार विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्र परीक्षांना सोमवार (दि. २२) पासून प्रारंभ होणार आहे. ऑनलाईन पद्धतीने ६१,५७४ तर ऑफलाईनचे ६३,८९६ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

ऑनलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना एसएमएस, लॉगीन, युजर आयडी व पासवर्ड पाठविण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या मॉक टेस्ट घेण्यात येत आहेत. ऑनलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शंका, अडी-अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर २० हेल्पलाईन क्रमांक देण्यात आले आहेत. ऑफलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयांना देण्यात आली आहे.

## परीक्षा उद्यापासून

पदवी व पदव्युत्तरच्या १२४ परीक्षा चार सत्रांत घेतल्या जाणार आहेत. २२ मार्चपासून बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बीबीए, बीसीए, बीटीएस अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होणार आहेत. ५० गुणांची बहुपर्यायी प्रश्नावली पद्धतीने ऑनलाईन, ऑफलाईन स्वरूपात घेण्यात येणार आहेत. २५ प्रश्नांसाठी प्रत्येकी दोन गुण असणार आहेत. ऑफलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेकरिता स्वतंत्र उत्तरपत्रिका वापरू नये. परीक्षेकरिता विद्यापीठाकडून 'ओएमआर' शीट पुरविण्यात येणार आहे. 'दूरशिक्षण' पद्धतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधित अभ्यास केंद्राच्या महाविद्यालयात होणार आहेत. परीक्षासंदर्भातील माहितीसाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुढारी

# नाईट कॉलेजमध्ये मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी नाईट कॉलेज ऑफ आर्टस्‌अँड कॉमर्स मराठी विभागाच्या वतीने मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम २५ मार्च ते २५ एप्रिल या एक महिन्याच्या कालावधीत घेण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग मान्यताप्राप्त या कोर्समध्ये मोडी लिपीचे वाचन, लेखन यांचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्र. प्राचार्य डॉ. एस.जे. फराकटे यांनी केले.